## प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली

## हवामानावर आधारीत कृषि सल्ला (पालघर जिल्हा)

**(०२३५८) २८२३८७**

**अंक ८५/२०१९** **दिनांक २२/१०/२०१९** **कालावधी ५ दिवस**


| | | |
|---|---|---|
| **डॉ. प्रशांत बोडके,** | **डॉ. विजय मोरे,** | **डॉ. शितल यादव,** |
| विभाग प्रमुख, | नोडल ऑफिसर, | तांत्रिक अधिकारी |
| कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग |
| ९४२०४१३२५५ | ९४२२३७४००१ | ८३७९९०११६० |


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक १६/१०/२०१९ ते २२/१०/२०१९) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक २३/१०/२०१९ सकाळी ८:३० पासून २७/१०/२०१९ सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **१६/१०** | **१७/१०** | **१८/१०** | **१९/१०** | **२०/१०** | **२१/१०** | **२२/१०** | | **२३/१०** | **२४/१०** | **२५/१०** | **२६/१०** | **२७/१०** |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ३.४ | १.० | - | **पाऊस (मिमी)** | १२ | ७ | ७ | ० | ० |
| ३५.० | ३४.० | ३५.० | ३४.४ | २९.० | २८.० | ३३.० | **कमाल तापमान (अं.से)** | २६ | २८ | ३० | ३० | ३० |
| २५.६ | २३.४ | २५.० | २६.० | २५.० | २५.२ | २५.० | **किमान तापमान (अं.से)** | २३ | २३ | २४ | २४ | २४ |
| ० | ० | ० | २ | २ | १ | - | **मेघाच्छादन (ऑक्टा)** | ८ | ८ | ८ | ८ | ८ |
| ६६ | ६३ | ७६ | ८६ | ८७ | ८३ | - | **सकाळची सापेक्ष आर्द्रता** | ८५ | ८३ | ७८ | ७५ | ६८ |
| ५६ | ४३ | ४९ | ७७ | ७४ | ६२ | - | **दुपारची सापेक्ष आर्द्रता** | ७९ | ७० | ६८ | ६१ | ५९ |
| २.९ | १.४ | १.८ | ०.७ | १.१ | ०.९ | - | **वाऱ्याचा वेग (किमी/तास)** | ६.५ | ८.३ | ८.५ | १२.८ | १२.९ |
| प. | प. | प. | वा.प. | इ.उ. | नै.द. | नै.प. | **वाऱ्याची दिशा** | आ.पु. | पु. | पु. | . इ.पु. | इ |

| **पाऊस (मिमी) मागील आठवडयातील** | **पाऊस (मिमी) १/१/२०१९ पासून आजपर्यंत** | **पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा** |
|---|---|---|
| **४.४** | **४१६०.८** | **२३५९.६** |

### हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला

**दिनांक २३ ते २५ ऑक्टोबर, २०१९ दरम्यान तुरळक ठिकाणी हलक्या स्वरूपाच्या पाऊसाची शक्यता असून आकाश मेघाच्छादित राहील. दिनांक २५ ते ३१ ऑक्टोबर, २०१९ साठी कोंकण विभागासाठी पर्जन्यमानाचा विस्तारित श्रेणी अंदाज हा सामान्यपेक्षा जास्त राहील. सामान्य फरक वनस्पती निर्देशांक (NDVI) नुसार पालघर जिल्ह्यामध्ये वनस्पती निर्देशांक मध्यम स्वरूपाचा आणि प्रमाणित पर्जन्यमान निर्देशांक (SPI) नुसार सौम्य ओलावा स्थिती दर्शविण्यात आली आहे.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| **भात** | **दाणे भरणे ते पक्व अवस्था** | • गरवे भात दाणे भरण्याच्या अवस्थेत असल्याने भात खाचरात पाण्याची पातळी ५ सें.मी. पर्यंत ठेवावी. निमगरवे भात पक्व होवू लागल्यास कापणी पूर्वी ८-१० दिवस भात खाचरातील पाणी बाहेर काढून टाकावे.<br>• पुढील तीन दिवस पाऊसाची शक्यता असल्याने पाऊसाचा अंदाज घेवून तयार झालेल्या भात पिकाची **सकाळच्या वेळेस** "वैभव" विळ्याच्या सहाय्याने जमिनीलगत कापणी करून लगेच मळणी करून साठवणी अगोदर २ ते ३ उन्हे देऊन धान्य वाळवावे. |
| **आंबा** | **पालवी** | • खोडकिडीच्या प्रादुर्भाबाकडे बागेतील झाडांची नियमित पाहणी करावी. ही कीड झाडाची साल पोखरून आतील गाभा खाते. खोडकिडीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी १५ एम. एम. पटाशीच्या सहाय्याने प्रादुर्भित साल काढून झाडातील खोड किडीला बाहेर काढून मारुन टाकावे. नंतर हा भाग क्लोरपायरीफॉस २० टक्के प्रवाही ५ मि. ली. प्रती १ लिटर या प्रमाणात द्रावण तयार करून प्रादुर्भित भाग द्रावणाने चांगला भिजवावा किंवा क्लोरपायरीफॉस २० टक्के प्रवाही १० मि. ली. + ५० मि.ली. रॉकेल खोडकीडीच्या छिद्रामध्ये ओतावे.<br>• ढगाळ व दमट वातावरणामुळे, आंब्याच्या नवीन येणाऱ्या पालवीवर तुडतुडे, शेंडे पोखरणारी आणि मिजमाशीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने पालवीचे किडींपासून संरक्षण करण्यासाठी लॅम्बडासायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ६ मि.ली. किंवा क्विनोलफॉस २५ टक्के प्रवाही २५ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून पाऊसाची उघडीप असताना फवारणी करावी. |
| **नारळ** | **फळधारणा** | • नारळा वरील सोंड्या भुंग्याच्या नियंत्रणासाठी शक्य असतील तेवढया अळ्या कोयतीच्या सहाय्याने काढून टाकाव्यात तसेच खोडावर १ मीटर उंचीवर गिरमीटाच्या सहाय्याने १५ ते २० से.मी. खोल तिरपे भोक पाडून त्यामध्ये २० मि.ली. ३६ टक्के मोनोक्रोटोफॉस प्रवाही कीटकनाशक नरसाळ्याच्या सहाय्याने ओतावे आणि भोक सिमेंटच्या सहाय्याने बंद करावे. |
| **भाजीपाला रोपवाटिका** | **रोप अवस्था** | • रब्बी भाजीपाला रोपवाटीकेतील रोपांच्या जोमदार वाढीसाठी पेरणीनंतर १५ दिवसांनी प्रत्येक वाफ्यास ५० ग्रम युरियाची मात्र द्यावी. |

• **टिप :** फवारणी पाऊसाची उघडीप असताना करावी.

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोलीयेथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसारतयार करून प्रसारित करण्यात आली.**

**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा**